# नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दल




## सुरक्षा उपाययोजना

संकल्पना

**डॉ. आरती सिंह** भा.पो.से.

पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण

| नियंत्रण कक्ष नाशिक ग्रामीण | नियंत्रण कक्ष मालेगाव |
|---|---|
| ☎ 0253-2309715 | ☎ 02554-231000 |

**कोव्हीड 19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मालेगाव शहरात बंदोबस्त कामी तैनात करण्यात आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मा. पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे :–**



- पुरविण्यात आलेल्या एन–95 मास्कचाच वापर करावा व त्यावरुन चेहऱ्यावर फेस शिल्ड लावण्यात यावे, जेणे करुन कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव होणार नाही.
- नव्याने पुरविण्यात आलेले स्वित्झलँडचे पेटेटेंड VIRUS INACTIVATION TECHNOLOGY असलेले मास्क हे बाजारात उपलब्ध मास्कपेक्षा उत्तम दर्जाचे असुन, मास्क धुवुन पुन्हा वापरण्याजोगे असल्याने त्याचा वापर करावा.



- हात वारंवार पुरविण्यात आलेल्या सॅनिटाईजरने स्वच्छ ठेवावे व नंतरच चेहऱ्याला हात लावावे.
- सर्वांनाच PPE किट पुरविण्यात आलेले असुन आवश्यकतेनुसार त्याचा वापर करावा व पुरविण्यात आलेले शु–कव्हर कंटेनमेंट झोन परीसर व हॉस्पीटल तसेच आवश्यकतेनुसार वापरावे.
- निवासाच्या व बंदोबस्ताच्या ठिकाणी अद्ययावत निर्जंतुकीकरण सोडीअम हायपोक्लोराईड फवारणी पंपाची व सोय केलेली असुन, नियमीतपणे आपले बसण्याचे ठिकाण, खाट, साहित्य, बुट इत्यादींची राहण्याचे ठिकाणी फवारणी करुन स्वच्छ ठेवावे.
- हात सॅनिटाईजरने स्वच्छ केल्यानंतरच हॅण्ड ग्लोव्हज परीधान करावे.
- नियमीतपणे आपले आरोग्य तपासणीसाठी वैद्यकीय पथक व औषधे उपलब्ध केली असुन, आपल्या वेळेप्रमाणे तपासणी करुन घ्यावी. डॉक्टरांच्या सल्ल्यानेच HCQ टॅबलेटस् घ्यावी. तसेच इम्युनिटी स्ट्राँग करण्याकरीता आपणास देण्यात आलेल्या VITMIN-C, ARSENIC ALBUM-30 व CAMPHORA 1M या गोळयांचे सेवन ठरवून दिलेल्या वेळेनुसार घ्यावे.
- बंदोबस्ताचे ठिकाणी आपणासाठी स्वतंत्र मोबाईल टॉइलेट उभारले असुन, त्यांचे दरवाजाचे कडी व नळ यांना सॅनिटाईज करुन मगच हात लावावा.
- बंदोबस्तावरील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व प्रभारी अधिकारी यांचेकडे आपणाकरीता पल्स ऑक्सीमीटर व थर्मल स्कॅनर देण्यात आलेले असुन पाईंट चेकींगचे वेळी त्यांचे करवी देखील स्वतःची नियमीत तपासणी करुन घ्यावी.
- निवासाचे ठिकाणी व बंदोबस्ताचे ठिकाणी आपणास वॉटर हिटर केटली पुरविण्यात आलेली असून त्याद्वारे नियमीत पाणी गरम करुन शक्यतोवर हळद टाकून पीत राहावे.



# हे करावे

## 1) कर्तव्यावर असताना :

- आपल्या दैनंदीन कामकाजाला सुरुवात करण्यापुर्वी आपले हात साबण व पाण्याने किमान 20 सेकंद स्वच्छ धुवावे. यानंतरच हातमोज्यांचा वापर करावा.
- सॅनिटाईजर हातावर घेवून दोन्ही तळहातांना मागे पुढे लावुन घ्यावे.
- कर्तव्याचे ठिकाणी व राहण्याचे ठिकाणी ज्या वस्तुंना वारंवार हाताने स्पर्श होण्याचा संभव आहे अशा गोष्टींना उदारणार्थ खुर्ची, लाठी, वॉकी–टॉकी इत्यादी 2 ते 3 तासांने 1 टक्का प्रमाणांत सोडीअम हायपोक्लोराईड असलेल्या निर्जंतुकीकरण द्रावणाने स्वच्छ करावे.
- दैनंदीन कर्तव्य पार पाडतांना 2 व्यक्तीमधील कमीत कमी अंतर 2 मीटर ठेवावे.
- आपला मोबाईल देखील सॅनिटाईजरने वेळोवेळी स्वच्छ करावा व शक्यतो स्पीकर फोनचा वापर करावा.



- मास्क वापरतांना सदर मास्क तोंड व हनुवटी झाकुन जाईल अशा पद्धतीने लावावा. एकदाच वापरायचा मास्क असल्यास व तो ओलसर झाल्यास तो त्वरीत बंद कचरा पेटीत शक्य असल्यास कागदात लपेटून फेकावा व नवीन मास्क लावावा.
- त्याचप्रमाणे वापरलेले मास्क, रबरी हातमोजे यांची विल्हेवाट बंद कचरापेटीतच करावी.
- मास्क काढतांना प्रथमतः मागून काढावा नंतर लेस कडून मास्क हाताळावा. मास्क काढतांना मास्कचा शरीराच्या इतर कोणत्याही भागाला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी.
- चहा पितांना आपल्या सोबतच्याने मास्क घातलेला आहे का याची खात्री करुनच मास्क काढुन चहा प्यावा.
- जेवणापुर्वी, जेवण झालेवर, टॉईलेटचा वापर केल्यावर हात स्वच्छ (20 सेकंद) धुणे गरजेचे आहे.
- कर्तव्यावर असतांना आपलेकडील लाठीचा स्पर्श जमिनीला तसेच कोणत्याही व्यक्तीस होणार नाही. याबाबत दक्षता घ्यावी आणि तसे झाल्यास सोडीअम हायपोक्लाराईडची फवारणी करावी.



- कर्तव्यावर असतांना आपलेकडील असणारी खुर्चीवर बसण्यापुर्वी निर्जंतुकीकरण (सोडीअम हायपोक्लोराईडने) केले नंतरच वापरात आणावी.
- कर्तव्य पार पाडत असतांना कोणत्याही व्यक्तीस अथवा वस्तुस स्पर्श झाल्यास तात्काळ सॅनिटाईझरने हात स्वच्छ करावे.

## 2) निवासाचे ठिकाणी असतांना :

- निवासस्थानी प्रवेश करण्यापुर्वी आपणासोबत असलेल्या वस्तुवर निर्जंतुकीकरण फवारणी करुनच आत प्रवेश करावा.
- कर्तव्यावरुन परतल्यास आपले बुट सोडीअम हायपोक्लारोईड द्रावणाने स्वच्छ करुन बाहेरच ठेवावे.
- निवासाचे ठिकाणी आल्यावर मास्क, फेसमास्क, हेड कव्हर, चष्मा हे व्यवस्थीत निर्जंतुकीकरण करावे व त्यास कोणी स्पर्श करणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.
- नेहमी गरम पाण्याचे सेवन करावे तसेच गरम पाण्याची वाफ घेऊन गुळण्या कराव्यात.
- कपडे काढून गरम पाण्यात भिजायला ठेवणे व आंघोळ करुनच घरात वावरणे. त्यातही घरातील व्यक्तींसोबत अंतर ठेवुन वावर करावा.
- गणवेशातील साहित्य हे काढतेवेळी सॅनिटाईज केलेबाबत खात्री करावी तसेच लाठी व वेपन सोडीयम हायपोक्लोराईड द्रावणाने साफ करावे.
- आपला मोबाईल देखील सॅनिटाईजरने वेळोवेळी स्वच्छ करावा व शक्यतो स्पीकर फोनचा वापर करावा.
- जेवणापुर्वी, जेवण झालेवर, टॉइलेटचा वापर केल्यावर हात स्वच्छ (20 सेकंद) धुणे गरजेचे आहे.
- आपण वापरणारे टॉवेल, भांडे, साबण व इतर वस्तू वेगळे ठेवा.
- टॉयलेट व बाथरूम वापरण्यापूर्वी दरवाज्याच्या कड्या व हँडल सॅनिटाईज करून वापर करावा.

## 3) प्रवास करतांना :

- वाहनातून प्रवास करत असतांना एकमेकांपासुन सुरक्षित अंतर ठेवून बसावे तसेच वाहनातील कोणत्याही वस्तुला स्पर्श होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- प्रवास करत असतांना इतर जणांसोबत स्पर्श झाल्यास हात सॅनिटाईज करा.
- पुरविण्यात आलेल्या मास्कचा वापर करावा.
- प्रवास करताना बस व गाड्यांचे नियमीत फॉगिंग करावे.
- वाहन चालकाने वाहन ताब्यात घेतांना व वापर करण्यापूर्वी डोअर हँडल, स्टेअरींग, गियर नॉब, डॅश बोर्ड, लॉग बोर्ड नियमीत सॅनिटाईज करूनच वापरावे.

**टिप :-** 1) आपणास बंदोबस्तादरम्यान काही अडचणी अथवा शंका असल्यास आपले प्रभारी अधिकारी अथवा कोव्हीड-19 कक्ष यांचेशी थेट संपर्क साधावा.

2) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी बंदोबस्त व इतर ठिकाणी नेहमी दोन व्यक्तींमध्ये 2 मीटरपेक्षा जास्त आंतर ठेवूनच बोलावे.

## हे करू नये

### 1) कर्तव्यावर असतांना :

- हाताने चेहरा, डोळे, नाक, तोंड यांना स्पर्श करु नये.
- मोबाईलचा स्पर्श शक्यतो चेहऱ्याला होवू नये.
- कर्तव्याचे ठिकाणी वाहनातून जातांना एकत्र बसू नये. तसेच आपापले सामानही एकामेकांच्या संपर्कात येणे टाळावे.
- एकमेकांचे मोबाईल फोन, रुमाल, पाणी बॉटल, ग्लास, डब्बा इत्यादी बाबी वापरु नयेत अथवा हाताळू नयेत.
- पैश्यांचा व्यवहार करतांना शक्यतो डिजीटल टेक्नॉलॉजीचा वापर करावा, रोखीत व्यवहार करु नयेत.
- इतरत्र कुठेही थुंकू नये.

### 2) निवासाचे ठिकाणी असताना :

- एकत्र जेवायला बसणे अथवा चहा पिणे कटाक्षाने टाळावे.
- राहण्याचे ठिकाणी देखील जवळजवळ कोणीही झोपणार नाही याची खात्री करुन आपापले सामानही इतरांना स्पर्श होण्याचे टाळावे.
- कर्तव्यावरुन परतल्यावर बुट घरामध्ये नेणे टाळावे.
- बाहेरील वस्तू खरेदी केल्यानंतर वस्तू सॅनिटाईज केल्याशिवाय वापरास घेवू नये.
- निवासस्थानी इतरांनी वापर केलेल्या वस्तुंची हाताळणी करू नये.

### 3) प्रवास करतांना :

- आपापले सामानही एकामेकांच्या संपर्कात येणे टाळावे.
- इतरत्र कुठेही थुंकू नये.
- प्रवास करुन निवासाचे ठिकाणी जाताना निर्जंतुकीकरण फवारणी झालेशिवाय आत प्रवेश करु नये.

## नागरीकांच्या पास संबंधी

कोरोना पार्श्वभूमीवर नाशिक ग्रामीण जिल्हा मधील अत्यावश्यक सेवा व परराज्यातील अडकलेले विद्यार्थी, कामगार आणि इतर नागरिक यांना पासेस वितरित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक अंतर्गत नियुक्त उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी (Incident Commander) करीत असल्याने नागरिकांनी सदर कार्यालयात संपर्क साधावा.

**नागरिकांनी nashikepass.in या संकेस्थळावरुन जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे ऑनलाईन अर्ज करावेत. विहित अटी, शर्ती व गुणवत्तेच्या आधारावर आपणास जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथुन परवानगी देऊन ई पास देण्यात येईल.**

**संपर्क क्रमांक : 0253-2232352**

**अत्यावश्यक सेवा / इतर जिल्ह्यातील / परराज्यातील नागरिक यांना जाण्यासाठी परवानगी देणेबाबत nashikepass.in या संकेतस्थळाचा वापर करावा.**

# पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामिण

**1) कोव्हीड-19 हेल्पलाईन :-** याद्वारे बंदोबस्तावर असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे आरोग्य विषयक तक्रारी तसेच कर्तव्य करीत असतांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी हेल्पलाईन नंबर उपलब्ध करून दिलेले आहेत. त्यासाठी सपोनि. श्रीमती आरणे व पोउनि. श्री. दाभाडे यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

○ 8806377771 ○ 8806977771

**2) मानव संसाधन विभाग :-** पोलीसांकरीता पुरविण्यात येणाऱ्या साहित्याचे योग्यरित्या समान वाटप होणेकरीता तसेच आवश्यक ती मदत सर्व स्तरावर पोलीस कर्मचाऱ्यांपर्यंत वेळोवेळी पोहचविण्याकरीता मानव संसाधन विभाग, पोलीस निरीक्षक, श्री. अनमुलवार व त्यांचेकडील पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

**3) पोलीस फिवर क्लिनीक :-** पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज आडगांव, नाशिक या ठिकाणी पोलीस फिवर क्लिनीक सुरू करण्यात आले आहे. तेथील वैद्यकीय अधिकारी 24 तास उपलब्ध आहेत. त्याबद्दलची अधिक माहिती संबंधीत नोडल अधिकारी तसेच पोलीस कोव्हीड-19 हेल्पलाईन येथे उपलब्ध असेल.

**समन्वय अधिकारी : पो.नि. श्री. नरसुडे (मो.9823832326)**

| | |
|---|---|
| पो.नि. श्री. सुरेश सपकाळे<br>ने. नाशिक तालुका पो.स्टे.<br>(मो. 9823295777) | सिव्हील हॉस्पिटल/<br>डॉ. जाकीर हुसेन<br>हॉस्पिटल, नाशिक |
| स.पो.नि. श्रीमती स्वप्ना शहापूरकर<br>(मो. 9011027310) | अपोलो हॉस्पिटल, नाशिक |
| स.पो.नि. श्रीमती पुष्पा आरणे<br>(मो. 7588096464) | डॉ. वसंत पवार<br>हॉस्पिटल, नाशिक |

**4) कोव्हिड केअर सेंटर :-** कोव्हिड-19 पॉझिटिव्ह पोलीस कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मालेगांव येथे 04 ठिकाणी इन्स्टिट्युशनल क्वारंटाईन सेंटर तयार केले आहेत. तसेच कोव्हिड केअर सेंटर 2 ठिकाणी, डेडीकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर मालेगाव येथे 3 ठिकाणी व नाशिक येथे 1 ठिकाणी तयार करण्यात आलेले आहे.



**नेहमी मास्कचा वापर करा**

**सॅनिटायरजरने नियमीत हात धुवा**





**शारिरीक आंतर २ मिटरपेक्षा जास्त ठेवा**